# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**अर्जुना-मोरगाव (जि.गोंदिया) येथे सागवान झाडे तोडून तस्करी करणा-यांना अडविले असता आरोपींनी हल्ला केल्याबाबत**

**(१) १२९९० (०८-०४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुना-मोरगाव (जि.गोंदिया) येथे सागवान झाडे तोडून तस्करी करणा-यांना अडविले असता आरोपींनी हल्ला केल्याचे धाबेटेकडी, सह वनक्षेत्रातील तिडका बी.क्रमाक-४ मध्ये घडली असल्याचे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागातील सागवान तस्करी रोखण्यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(३) नसल्या, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :**(१) अर्जुना-मोरगाव (जि.गोंदिया) येथील धाबेटेकडी सह वनक्षेत्रातील तिडका बीटक्र.४ अंतर्गत वोळदे/करंड या गावी सागवान झाडे तोडून तस्करी करणा-यांना अडविले असता आरोपींनीहल्ला केलयाची बाब खरी नाही. तथापि, अवैध चिराणा जप्त करण्याच्या कार्यवाहीत आरोनींनी वनकर्मचा-यांवर हल्ला केला हे खरे आहे.

(२) व (३) वनविभागातील कर्मचारी हे त्यांचे नियतक्षेत्रात नियमित गस्त करीत असतात व आढळलेल्या वृक्षतोडी संबंधी गुन्हा जारी करुन गुन्हेगाराचा शोध घेत असतात चोरी केलेला वनोपज शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. याव्यतिरिक्त रात्रीच्या गस्तीच्या वेळी अनेकदा पोलीस विभागाच्या सहकार्याने आकिस्मक नाकाबंदी करुन येणा-या जाणा-या वाहनांची तपासणी करण्यात येते.

---

**तिरोडा पोलीस ठाण्यांतर्गत (जि.गोंदिया) येथे एका महिलेचे सोशल नेटवर्कींगसाईटवर अश्लिल फोटो व महिती देऊन सदर महिलेस बदनाम केल्याबाबत**

**(२) १२९९५ (७-४-२०१५). श्री. गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा पोलीस ठाण्यांतर्गत (जि.गोंदिया) टिळक वॉर्डातील एका २१ वर्षीय महिलेचे खोटे अकाऊंट प्रोफाईल तयार करुन सोशल नेटवर्कींगवर अश्लिल फोटो व माहिती देवून सदर महिलेस बदनाम केल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-४-२०१५) :**(१) व (२) तिरोडा पोलीस ठाण्यांतर्गत (जि.गोंदिया) टिळक वॉर्डातील एका १५ वर्षीय मुलीच्या नावाचा व वैयक्तिक माहितीचा अज्ञात आरोपीने वापर करुन फसेबुक या सोशल नेटवर्किंग वेबसाईट्सवर दि.३.१.२०१५ रोजी अकाऊंट तयार करुन अकाऊंटवर एका अनोळखी महिलेचा अश्लील फोटो व माहिती अपलोड केली आहे. या संदर्भात दि.२१.१.२०१५ रोजी तिरोडा पोलीस स्टेशन येथे अज्ञात आरोपी विरुध्द दिलेल्या रिपोर्टवर अप क्र.३००४/१५ कलम ६६ (सी), ६७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुस्लिम समाजातील मागासलेल्या व वंचीत घटकांच्या सर्वांगिण विकासासाठी आरक्षण लागू करण्याबाबत**

**(३) १३०४७ (०७-०४-२०१५). ॲड. वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम समाजातील मागासलेल्या व वंचीत घटकांच्या सर्वांगिण विकासासाठी पुन्हा आरक्षण लागू करण्यासाठी महाधिवक्त्यांशी सल्लामसलत करण्याचा निर्णय शासनातर्फे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुस्लिम समाजातील मागासलेल्या विविध घटकांना फक्त शिक्षण क्षेत्रापुरतेच आरक्षण देण्यासाठी मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समाजातील मागासलेल्यांना नोक-यांत आरक्षण देण्यासाठी शासनातर्फे आजवर कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्व साधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५)** :(१) होय.

(२) नाही.

(३) कायदेशीर बाबी तपासून आरक्षणाविषयी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात सन २०१२-१३ वर्षात बुलेटप्रुफ जॅकेट**
**खरेदी करण्याकरिता राबविलेली निविदा प्रक्रिया**

**(४) १३०५२ (०८-०४-२०१५). ॲड. वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सन २०१२-१३ वर्षात बुलेटप्रुफ जॅकेट करण्याकरिता राबविलेली निविदा प्रक्रिया मध्ये मे. डिफेन्स सिस्टीम, नागपूर या कंपनीला ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याकरिता दि. २०.११.२०१३ नुसार आदेश देण्यात आले. सदर कंपनीतर्फे कस्टम डयुटी प्रमाणपत्राची पुर्तता झाल्यावर किमान ४५ दिवसात बुलेटप्रुफ जॅकेटचा पुरवठा करण्याचे मान्य केले, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, बुलेटप्रुफ जॅकेटचा पुरवठा करण्यासाठी आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५)** :(१) सन २०१३-१४ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलाकरीता ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर निविदेतील न्युनतम निविदाकार M/s. Neco Defence System, Nagpur यांना ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याकीरता दिनांक २०.११.२०१३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यानुसार M/s. Neco Defence System, Nagpur यांनी मालाचा पुरवठा करण्यापूर्वी बुलेटप्रुफ जॅकेटचे सॅम्पल तपासणी करता सदर केले होते.

सदर बुलेटप्रुफ जॅकेटचे सॅम्पल विशेष पोलिस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई यांचेमार्फत CFSL Chandigarh येथे बॅलेस्टिक तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. सदरचे सॅम्पल बॅलेस्टिक तपासणीमध्ये अपात्र ठरले होते त्यामुळे बुलेटप्रुफ जॅकेटमध्ये आवश्यक ती सुधारणा करून पुन्हा सॅम्पल उपलब्ध करून देण्याबाबत M/s. Neco Defence System, Nagpur यांना कळविण्यात आले होते. त्यानुसाद दिनांक २३.०४.२०१४ रोजी पुन्हा सॅम्पल उपलब्ध करून दिले होते. परंतु सदरचे सॅम्पल दुसऱ्या वेळेसही बॅलेस्टिक तपासणीमध्ये अपात्र ठरले. त्यामुळे पोलिस महासंचालक कार्यालयाने त्यांच्या दिनांक २२.१०.२०१४ च्या पत्रान्वये M/s. Neco Defence System, Nagpur यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करण्यात आले आहेत.

त्यामुळे बुलेटप्रुफ जॅकेटची सन २०१३-१४ मध्ये खरेदी होऊ शकली नाही.

(२) महाराष्ट्र पोलीस दलासाठी ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेटची खरेदी करण्यासाठी पुन्हा नव्याने निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील अपंग व त्यांचे कुटुंबियांना अंत्योदय योजनेंतर्गत धान्य मिळत नसल्याबाबत**

**(५) १३०८४ (०७-०४-२०१५). श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंग व त्यांचे कुटुंबाला अपंग व्यक्ती कायद्यातील तरतुदीनुसार व राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेनुसार अंत्योदय योजनेंतर्गत मासिक ३५ किलो धान्य देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील अपंग व त्यांचे कुटुंबियांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेनुसार अंत्योदय योजनेतील धान्य देण्याबाबत दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागण्या पुर्ण करणेबाबत राज्य अपंग बेरोजगार व पुनर्वसन संस्थेने शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंत्योदय योजनेतील धान्य, अपंगांना बेरोजगार भत्ता व इतर सवलती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) नाही. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील अपंग व त्यांच्या कुटुंबातील शिधापत्रिका धारकांना अंत्योदय योजनेअंतर्गत प्रतीमाह ३५ किलो धान्य नियमितपणे वितरीत करण्यात येत असून त्यामध्ये टाळाटाळ केल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा (जि. जळगांव) येथील भुईकोट किल्ल्याचे सुशोभिकरण व दुरुती निकृष्ट झाल्याबाबत**

**(६) १३०९७ (०७-०४-२०१५). डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगांव) येथील भुईकोट किल्ल्याच्या सुशोभिकरण व दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाकडून रुपये ४ कोटी प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी किती खर्च करण्यात आला व कोणत्या कामावर करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदरचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याच्या तक्रारी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) नाही,

पोरोळा किल्ल्याच्या जतन व दुरस्तीसाठी सन २०१३-१४ करीता तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त होणा-या निधीतून रु.४.०० कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून सदर निधी अद्याप प्राप्त झालेला नाही.

तसेच सदर किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीकरीता सन २०११-१२ च्या निधीतून रु.८५ लक्ष इतक्या रकमेची कामे करण्यात आली असून सद्यस्थिती तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१२-१३ करीता प्राप्त निधीतून रु.१.०० कोटी इतक्या रकमेची कामे सुरु करण्यात येत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबा बागायतीचे नुकसान लक्षात घेता नुकसानीची ही मर्यादा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव**

**(७) १३११७ (०७-०४-२०१५). श्री. संजय पोतनीस (कलिना), श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दरवर्षी होणारे आंबा बागायतीचे नुकसान लक्षात घेता नुकसानीची ही मर्यादा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा वर्षात दोन ते तीन वेळा खराब वातावरणामुळे आंबा बागायतरांचे नुकसान होत असून शासन शेतक-यांच्या मागणीनुसार मदत देत आली आहे परंतु नुकसानीची दोन हेक्टरची मर्यादा वाढवून ती दहा हेक्टरपर्यंत करण्याबाबतचे मत महाराष्ट्र राज्य आंबा काजू मंडळाचे संचालक यांनी नुकतेच व्यक्त केले आहे हे ही खो आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबा कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :**(१) (२) व (३) नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ पासून झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसानग्रस्त आंबा बागायतदारांना दि.१३/४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२५,०००/- प्रति हेक्टरी अशी आर्थिक मदत मंजूरी करण्यात आलेली आहे तसेच सदर मदतीची मर्यादा दोन हेक्टर क्षेत्रापर्यंत वाढविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे सोन्नेवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे १३२ केव्हीचे सब स्टेशन उभारण्याबाबत**

**(८) १३१२८ (३०-०४-२०१५). श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोन्नेवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे १३२ केव्हीचे सब स्टेशन उभारण्याची मागणी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा अनेक वेळा केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०५-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भाच्या विकासाकरिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कोट्यवधीचा आराखडा मंजूर करण्याबाबत**

**(९) १३१३० (०८-०४-२०१५). श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ. आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भाच्या विकासाकरिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात कोट्यवधीचा आराखडा मंजूर करण्यात आला परंतु निधीअभावी ही विकासकामे रखडल्याबाबतचे वृत्त दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा निधी मिळाला नसल्यामुळे रस्ते, पाणी पुरवठा, शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, अंगणवाड्यांच्या इमारतींची डागडुजी, लघु पाटबंधारे, पुरनियंत्रण भिंती, रेशीम प्रकल्प, विद्युतीकरणाची कामे प्रभावीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असलस, सन २०१४-२०१५ मध्ये नागपूर जिल्ह्याकरीता ४२० कोटी रुपयांचा निधी तरतूद

आली असता त्यापैकी २४२ कोटीचा निधी प्राप्त झाला असून त्यामुध्ये १५७ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला, तर ८५ कोटी रुपयांचा निधी शिल्लक राहीलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्वरित व शिल्लक निधीचा उपयोग सन २०१४-१५ मध्ये न होण्याची कारणे काय,
(५) नसल्यास, उर्वरित व शिल्लक निधी खर्च न करण्याची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५) :**(१) व (२) विदर्भाच्या विकासासाठी सन २०१४-१५ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यातील विकास कामे निधी अभावी रखडली, हे खरे नाही.
(३), (४) व (५) सन २०१४-१५ मध्ये नागपूर जिल्हयाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना आणि आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र योजना) करीता रु.४२०.५९ कोटी नियतव्यय मंजूर असून त्यापैकी रु.४२०.५१ कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

उपरोक्त अर्थसंकल्पित नियतव्ययापैकी रु.३८८.४४ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून अनुसूचित जाती उपयोजनेचा रु.३२.०० कोटी व आदिवासी उपयोजनेचा रु.०.०७ कोटी असा एकूण रु.३२.०७ कोटी निधी अवितरीत आहे. आर्थिक वर्ष अखेर रु.३८५.२७ कोटी खर्च झालेला आहे. त्यामुळे विकास कामे निधी अभावी प्रभावित झाली असे म्हणता येणार नाही.

---

## गोसखुर्द धरणातील पाण्याचासाठा वाढल्याबाबत

**(१०) १३१८७ (०८-०४-२०१५). श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील बहुचर्चित गोसखुर्द अर्थात इंदीरा सागर राष्ट्रीय धरणातील पाण्याचासाठा वाढल्याने म्हसली ग्रामपंचायतीतील मो.धामणी, पवनी, पिपरी, उमरी व चिचघाट गांवाना पुराचा धोका निर्माण झाल्याबाबतचे वृत्त दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणाने हल्ली २४५ मीटरपर्यंतची उंची गाठली असून २४७ मीटर पर्यंत जलसाठा वाढविण्यात आल्यामुळे गावांना धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील कुटुंबाचे योग्यप्रकारे पुर्नवसन होऊ न शकल्यामुळे या गांवाना पुराचा धोका निर्माण झालो आहे, हे ही खर आहे काय,
(४) असल्यास, सदर गावातील पुराचा धोक लक्षात घेता पुर्नवसनाची प्रक्रिया त्वरीत पुर्ण करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, त्याची कालावधी काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५)** :(१) नाही.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील लांखाच्यावर हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असूनही मध्यम व लघु सिंचन प्रकल्पांपैकी १३ सिंचन प्रकल्प मान्यतेविना रखडले असल्याबाबत.**

**(११) १३१९९ (०८-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील लांखाच्यावर हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली असूनही मध्यम व लघु सिंचन प्रकल्पांपैकी १३ सिंचन प्रकल्प मान्यतेविना रखडले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त १३ सिचंन प्रकल्प रखडण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पांना मान्यता देऊन त्याचे कामे सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५)** :(१), (२) व (३) अकोला जिल्हात प्रशासकीय मान्यता प्राप्त एकुण १९ प्रकल्प आहेत. त्यापैकी ३ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ८ प्रकल्पांची कामे प्रगतीत असून व उर्वरित ७ प्रकल्पाची कामे, न्यायालयीन प्रकरण, संकल्पन, जनविरोध इत्यादी कारणांमुळे रखडलेली आहेत व १ प्रकल्प रद्द करण्यास्तव प्रस्तावित आहे.
(४) वरीलप्रमाणे कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील जलसुरक्षकांना मानधन मिळण्याबाबत**

**(१२) १३२०१ (०७-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अकोला जिल्ह्यातील हजारो जलसुरक्षकांना गत दोन वर्षापासून मानधन मिळाले नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय, त्यानुसार सदरहू जलसुरक्षकांना अद्यापपर्यंत मानधन न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर जलसुरक्षकांना तातडीने मानधन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :**(१) व (२) अकोला जिल्ह्यातील जलसुरक्षकांचे सन २०१३-१४ चे मानधन माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वितरीत करण्यात आले असून त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहेत. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी निधी प्राप्त झाला असून वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला शहरातील ९ औषधी दुकानांवर अनिश्चित कालावधीसाठी बंद ठेवण्याचे आदेश असतानाही सदर दुकाने सुरु असल्याबाबत**

**(१३) १३२०३ (०६-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरात काही दिवसांपूर्वी ९ औषधी दुकानांवर फार्मासिस्ट नसल्याच्या कारणावरुन अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिका-यांनी कारवाई करुन अनिश्चित कालावधीसाठी ते बंद ठेवण्याचे आदेश असतानाही संबधित अधिका-यांचे आदेश मान्य न करता औषध विक्रेत्यांनी सदर दुकाने सुरु ठेवले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू ९ औषधविक्रेत्या दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-०२०१) :**(१) हे खरे नाही.
तथापि, औषध पेढयांच्या तपासणीच्या वेळी ज्या ठिकाणी रजिस्टर्ड फार्मासिस्ट गैरहजर होते, तेथे चौकशीसाठी व अनुज्ञप्ती अधिकाऱ्यांच्या पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात औषध विक्री बंद करण्याचे आदेश तपासणीच्या वेळी देण्यात आले होत. त्यानंतर चौकशी करुन प्रकरण निहाय दोषांची तीव्रता विचारात घेऊन अनुज्ञप्ती अधिकाऱ्याने एकूण ९ प्रकरणांपैकी ५ प्रकरणी परवाने रद्द, ३ प्रकरणी परवाने निलंबित केले असून एका प्रकरणी पेढीस सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.
(२) वरीलप्रमाणे
(३) वरीलप्रमाणे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुर्व विदर्भातील सुमारे १३० माजी मालगुजारी तलाव बाबत

**(१४) १३२२३ (०८-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्व विदर्भातील सुमारे १३० माजी मालगुजारी तलाव जलसंपदा विभागाचे अखत्यारीत असून यांत्रिकी संघटनेची यंत्रसामुगी वापरुन तलावाचे खोलीकरण करण्याची योजना या विभागाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालगुजारी तलावाच्या दुरुस्तीच्या कामांचा अंतर्भाव “जलयुक्त शिवार” योजनेत करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत किती तलावांचे खोलीकरण करण्यात आले आहे, उर्वरित तलावांच्या खोलीकरणाचा कार्यक्रम शासनाने आखला आहे काय?

(४) नसल्यास विलबाची कारणेकोणती ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३) सद्य:स्थितीत ७० माजी मालगुजारी तलावातील गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित ५४ माजी मालगुजारी तलावातील गाळ काढण्याची कामे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील जटवाडा रोड ता.औरंगाबाद येथील गोल्फ ग्राउंडची जमीन गत २५ वर्षापासून विनावापर पडून असल्याबाबत

**(१५) १३२५२ (०७-०४-२०१५). श्री. प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद मधील जटवाडा रोड येथे गोल्फ ग्राउंडसाठी शासनाने जमीन प्रदान केली आहे, परंतू मागील २५ वर्षापासून या जमीनीचा वापर झाला नाही,हे खरे आहे काय,

(२) शासकीय जमीन प्रदान केल्यानंतर पुढील तीन वर्षात अशा जमीनीचा वापर सुरु न केल्यास शासन अशी जमीन परत घेते,परंतु गोल्फ ग्राउंडसाठी पर्यटन विकास महामंडळाकडून सदर जमीन शासनाने परत घेतली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) गोल्फ ग्राउंडची जमीन पर्यटन विकास महामंडळाकडून परत घेवून शासन या जमीनीचा वापर इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी वापर करणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) मौजे हर्सुल ता.दौलताबाद येथील क्षेत्र ७२ हेक्टर जागा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील दि.१८/२/१९९४ च्या आदेशान्वये गोल्फ कोर्ससाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास देण्यात आली. सदर जमिनीचा ताबा दि.२७/६/१९९५ च्या पत्रान्वये महामंडळास देण्यात आला. सदरील जागेचा ताबा घेतानाच अतिक्रमणे होती. त्यामुळे जागेचा विकास व भाडेपट्टा कराराची कार्यवाही वेळीच पूर्ण करणे शक्य झालेले नाही. सदर जागेचा पर्यटन विकास महामंडळाने रितसर निविदा प्रक्रियेने खाजगीकरणाचे माध्यमातून (PPP) मे.इनस्पिरा लेझर प्रा.लि.यांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दिला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व मे.इनस्पिरा लेझर प्रा.लि. यांचेमध्ये सदर प्रकल्पासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. महराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे समवेत प्राथमिक करार करण्याची कार्यवाही चालू आहे .
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिकलठाणा, ता.लातूर येथील मांजरा पदीवर बॅरेजेसचे पाणी थांबून नदी शेजारील घरांना धोका निर्माण झाल्याबाबत**

**(१६) १३२५९ (०८-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिकलठाणा, ता.लातूर येथील मांजरा पदीवर बॅरेजेसचे पाणी थांबून नदी शेजारील घरांना धोका निर्माण झाल्यामुळे सदर गावाजवहील नदीवर घाट बांधकाम करण्याबबात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.७.१.२०१५ रोजी वा त्या सुमारास मा.जिल्हधिकारी लातूर यांना निवेदन देऊन मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाट बांधकामाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर घाट बांधकामासा शासनास किती कालावधी लागणार आहे,
(४) अद्‌याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) दिनांक ०४/१०/२०१३ रोजी बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी (वैजनाथ) या कार्यालयास चिकलठाणा ग्रामपंचायतीकडून निवेदन प्राप्त झालेले आहे.
(२) नदीच्या पाण्यामुळे गावठाणास धोका निर्माण होत नसल्याने घाट बांधकामाची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**व्हटी (ता.रेणापूर, जि.लातूर) मध्यम प्रकल्पातून चार खेडी पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणी सुरु करण्याबाबत**

**(१७) १३२६० (०७-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्हटी ( ता.रेणापूर, जि.लातूर) मध्यम प्रकल्पातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची चार खेडी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून सदर योजनेचे पाणी सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर योजना सुरू होण्यास किती कालावधी लागेल,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर चार खेडी योजनेचा उद्भव व्हटी मध्यम प्रकल्पामधून असून सद्य:स्थितीत व्हटी मध्यम प्रकल्प कोरडा असल्याने सदर योजना त्वरीत सुरु करणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चिखलठाणा ( ता.जि.लातूर ) येथे सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरीचे काम करण्याबाबत**

**(१८) १३२६१ (०७-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखलठाणा ( ता.जि..लातूर ) येथे सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरीचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरिचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कामाबाबत शासनास किती कालावधी लागेल,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. तथापि सरपंच ग्रामपंचायत चिखलठाणा यांचे दिनांक ३.१.२०१४ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) ग्रामपंचायत चिखलठाणा यांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतू अद्यापपर्यंत प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(३) सदर कामास एक ते दीड वर्षाचा कालावधी लागणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात रोहित्रांची किटकॅट नसल्याने व केबलची दुरावस्था असल्याने सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत.**

**(१९) १३२७३ (०४-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात महावितरणाची वीज वितरण व्यवस्था कर्मचा-यांच्या अभावामुळे अनेक गावात रोहित्रांची किटकॅट नसल्याने व केबलची दुरावस्था असल्याने सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्याने अनेक गावातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचा भार त्या-त्या गावातील अप्रशिक्षित तरुण उचलत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर व औसा (जि.लातूर) तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांना शिधापत्रिका देण्याबाबत**

**(२०) १३२८० (०७-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर व औसा (जि.लातूर) तालुक्यातील अनेक गावातील नागरिकांना शिधापत्रिका नसल्याने नागरिकांनी शिधापत्रिका देण्याबाबत सततची मागणी तहसिल कार्यालयाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिधापत्रिका वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच उक्त तालुक्यात शिधापत्रिकेपासून वंचित असलेली कुटुंबाची संख्या किती आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०५-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे,
(२) लातूर जिल्ह्यातील रेणापूर व औसा तालुक्यातील नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार माहे जानेवारी, २०१५ ते मार्च, २०१५ या कालावधीत रेणापूर तालुक्यात नवीन २०८ व दुय्यम ६९ तसेच औसा तालुक्यात नवीन ८३० व दुय्यम १६४९ शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे वरील तालुक्यांतील कुटुंबे शिधापत्रिकेपासून वंचीत राहिलेली नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर जि.लातूर येथील १३२ kva चे सबस्टेश २२०kva चे करण्याबाबत.**

**(२१) १३२९० (३०-०४-२०१५). श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर जि.लातूर येथील १३२ kva चे सबस्टेशनवर विदयूतभार जास्तीचा असल्याने विघुत पुरवठा सुरळीत होण्याचे दृष्टीने सदर सबस्टेशन २२०kva चे करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.अधिक्षक अभियंता म.रा.वि.कंपनी लातूर व मा.कार्यकारी अभियंता, म.रा.वि.कं.लातूर यांचेकडे मागणी केली होती, हे खारे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ,
(३)असल्यास सदर सबस्टेशन २२०kva चे करण्यासाठी मंडळात किती खर्च येणार असून सदर बसस्टेशन २२० kva चे होण्यास किती कालावधी लागणार आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०५-२०१५)** :(१) होय,
(२) रेणापूर येथे अस्तित्वात असलेल्या महापारेषण कंपनीच्या १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राची स्थापित क्षमता २X५० एम.व्ही.ए. म्हणजेच एकूण १०० एम.व्ही.ए. असून त्यावर ३८ ते ४० मे. वॅ. कमाल वीज भाराची नोंद आहे. म्हणजेच सदर उपकेंद्रात क्षमता शिल्लक असून भविष्यात सदर उपकेंद्रावरील वीज भारात वाढ झाल्यास प्रणाली अभ्यासाद्वारे २२० के.व्ही. उपकेंद्राची शक्यता पडताळली जाईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगाव) रावेर, यावल, चोपडा आणि जामनेर तालुक्यात "उधीची राणी" (टर्माइड क्विन) किड्याचा काळाबाजार करणारी टोळी पकडण्यात आल्याबाबत**

**(२२) १३३२१ (०८-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगांव) रावेर, यावल, चोपडा आणि जामनेर तालुक्यात “उधीची राणी” (टर्माइड क्विन) किडयाचा काळाबाजार करणारी टोळी माहे जानेवारी, २०१५ मध्ये पकडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दाभिल (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील स्वस्त धान्य दुकानाचा परवाना रद्द करण्याची मागणी**

**(२३) १३३४० (०७-०४-२०१५). श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभिल (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील स्वस्त धान्य दुकानाचा परवाना रद्द करा तसेच पोलीस पाटील पद ही रद्द करा यासह विविध मागण्यासाठी आजरा तहसिल कार्यालयासमोर मुक्ती संघर्ष समिती कोल्हापूर गत दोन महिने आंदोलन करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनाची दखल घेत पुणे विभागाचे पुरवठा उपायुक्त यांनी चौकशीचे आदेश देवून सुध्दा प्रांत अधिकारी तसेच तहसिलदार यांनी संबंधितांवर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :**(१) दाभिल (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील स्वस्त धान्य दुकानाचा परवाना रद्द करणे, पोलीस पाटलाचे पद रद्द करणे इ.मागण्यांकरिता मुक्ती संघर्ष समिती यांचेकडून तहसिलदार कार्यालयासमोर माहे डिसेंबर, २०१४ मध्ये आंदोलन करण्यात आले होते.
(२) व (३) याप्रकरणी उप विभागीय अधिकारी भुदरगड, आजरा यांनी सदर दुकानाची तपासणी केली असता तपासणीमध्ये गंभीर दोष आढळून आल्याने सदर दुकान रद्द करण्याची शिफारस जिल्हा पुरवठा अधिकारी कोल्हापूर यांचेकडे केली होती. त्यानुसार सदर रास्तभाव दुकान व

किरकोळ केरोसिन परवाना दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून रद्द करण्यात आला आहे.

या आदेशाविरुद्ध सदर परवाना धारकाने उप आयुक्त (पुरवठा) पुणे यांचेकडे पुनर्निरिक्षण अपिल दाखल केले आहे. या अपिलावर उप आयुक्त यांचेकडून आदेश पारित होईपर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे आदेशास स्थगिती देण्यात आली आहे.

---

**आंतरराष्ट्रीय कॉल्स व्हीओआयपी (व्हॉईस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल) च्या माध्यमातून लोकल कॉल उपलब्ध करुन शासनाचे तसेच विविध मोबाईल कंपन्यांचे नुकसान केल्याबाबत**

**(२४) १३३६२ (८/४/२०१५). श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) आंतरराष्ट्रीय कॉल्स व्हीओआयपी (व्हॉईस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल) च्या माध्यमातून लोकल कॉल उपलब्ध करुन शासनाचे तसेच विविध मोबाईल कंपन्यांचे सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी एका अभियंतासह दोघांना इचलकरंजी पोलीसांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशी अंती शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८/५/२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी शहरामध्ये दि.२३.१.२०१५ रोजी इचलकरंजी पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात एअरटेल, रिलायन्स, आयडिया, टाटा डोकोमो, व्होडाफोन, बीएसएनएल या मोबाईल कंपन्यांची व केंद्र शासनाची दि.३०.१२.२०१४ ते दि.२३.०१.२०१५ पर्यंतच्या मुदतीत फसवणूक करुन कंपन्यांना तसेच केंद्र शसनाला मिळणा-या उत्पन्नाच्या अंदाजे ०२ कोटी रुपयाचे नुकसान केले असून त्यानुषंगाने इचलकरंजी पोलीस ठाणे येथे भाग - ५ गु.र.नं. ११-२०१५ भा.दं.वि.सं. कलम ४२०, १२० (ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा ६६ (ड) सह भारतीय दूरसंचार अधिनियम कलम ४, २० प्रमाणे दि.२३.०१.२०१५ रोजी २०१० वा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने निष्पन्न ४२ साक्षीदारांकडे चौकशी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सहा आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी क्र.७ फरारी आहे. तसेच सदरहू गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १६५ साखर कारखान्यांपैकी ८९ सहकारी साखर कारखान्यांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र कार्यकारी संचालक नियुक्त न करता प्रभारी कार्यकारी संचालयाकाकडेच कारभार सोपविण्यात आल्याबाबत**

**(२५) १३३८३ (०९-०४-२०१५). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६५ साखर कारखान्यांपैकी ८९ सहकारी साखर कारखान्यांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र कार्यकारी संचालक नियुक्त न करता प्रभारी कार्यकारी संचालयाकाकडेच कारभार सोपविण्यात आला असल्यामुळे कारखान्यांचा कारभारात बेशिस्त पणा आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य लेखापाल चिफकेमिस्ट, चिफइंजिनिअर, सेक्रेटरी किंवा शेती अधिकारी या अधिका-याच्या मधून कार्यकारी संचालक पदावर नियुक्त करणा-यावर निवडसूची तयार करण्याच्या कार्यवाही सन २००२ पासून शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही. गाळप हंगाम २०१४-१५ मध्ये ९९ सहकारी साखर कारखान्यांनी गाळप हंगाम सुरु केला आहे. यापैकी ४४ सहकारी साखर कारखान्यावर पॅनलवरील कार्यवाही संचालक कार्यरत असून ५५ सहकारी साखर कारखान्यावर प्रभारी कार्यकारी संचालक काम पहात आहेत.

(२) होय. शासन निर्णय दि.२५.२.२००५ अन्वये कार्यकारी संचालकाची नामिका तयार करण्यासाठी साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत समितीमार्फत कार्यकारी संचालकाचे पॅनेल तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण होऊन मा.उच्च न्यायालयाचे दि. २६.३.२०१५ रोजीच्या आदेशानुसार ९९ उमेदवारांची कार्यकारी संचालक म्हणून निवडसूची घोषित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकवण्यात येणारा ऑप्रेटर एडव्हान्स मशीन ट्युल्सच्या विद्यार्थ्यांना राज्यात कुठल्याही प्रकल्पात नोकरी मिळत नसल्याबाबत**

**(२६) १३३८८ (०९-०४-२०१५). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोलापूर, पुणे, नाशिक व जळगाव येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये टिकवण्यात येणारा ऑपरेटर एडव्हान्स मशीन ट्युल्सच्या प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणानंतर महाराष्ट्रात कुठल्याही प्रकल्पात नोकरी मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला असून या नोकऱ्या महाराष्ट्रात आयुध निर्याती रेल्वे कारखाने अशा ठिकाणी उपलब्ध करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी उपलब्ध करुन देणाऱ्या नोकऱ्यांमध्ये वरील प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) राज्यातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झालेला नसून या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात. आयुध निर्यातील व रेल्वे कारखाने अशा ठिकाणी नोक-या उपलब्ध होत आहेत.
(३) आयुध निर्मिती व रेल्वे कारखाने केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असल्याने नोक-यांमध्ये सामावून घेण्याबाबतचा निर्णय संबंधित आस्थापनांनी घेणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील ऊसतोडीसाठी बाहेर गावी गेलेल्या बी.पी.एल. व अंत्योदय कार्डधारकाचे रेशनचे धान्य त्यांच्या नावाने घेवून जात असल्याबाबत**

**(२७) १३४०० (०७-०४-२०१५). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगांव) तालुक्यातील बी.पी.एल. व अंत्योदय कार्डधारक मोठया प्रमाणात ऊसतोडीसाठी बाहेर गावी जातात मात्र त्यांच्या नावाने रेशनचा गहू, तांदूळ घेवून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त लाभार्थ्यांना धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५) :**(१) अश्या आशयाची बातमी दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती.
(२) होय.
(३) पुरवठा तपासणी अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांनी केलेल्या चौकशीनुसार उस तोडीसाठी बाहेर असलेल्या कामगारांचया घरातील इतर सदस्यांनी धान्य नेले आहे तसेच काही कामगार त्यांच्या गावाच्या परिसरात कार्यरत असल्याने त्यांनी धान्य नेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहार (ता. पाचोरा जि. जळगांव) परिसरात दुष्काळ घोषित करण्यात आला असून पीक पैसावारी ४८ पैसे लागलेली असतांना राष्टीय कृषी पीक विमा योजनेच्या ५३३ शेतक-यांना अदयाप देण्यात न आल्याबाबत**

**(२८) १३४१८ (०७-०४-२०१५). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहार (ता. पाचोरा जि. जळगांव) परिसरात दुष्काळ घोषित करण्यात आला असून पीक पैसावारी ४८ पैसे लागलेली असतांना देखील हवामान आधारित राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेच्या ५३३ शेतक-यांना अदयाप देण्यात आला नाही हे खरे आहे काय ,

(२) पीक विमा योजनेचा लाभ सदर शेतक-यांना तातडीने देण्यात यावा अशी मागणी विविध कार्यकारी सहकारी संस्थेने निवेदनामध्ये जिल्हाधिकारी, जळगांव, जळगाव जिल्हा कृषी अधिकारी, पाचोरा, तहसिलदार पाचोरा यांच्याकडे दिनांक २३/१/२०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने शेतक-यांना विम्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५)** :(१) हवामान आधारित पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात रब्बी २०१३-१४ पासून पथदर्शक स्वरुपात क्षेत्र घटक धरुन (Area Approach) राबविण्यात येत आहे. खरीप २०१४ मध्ये सदरची योजना राज्यातील निवडक १२ जिल्हयातील निवडक ७ पिकांसाठी राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत संदर्भ हवामान केंद्रावर नोंद झालेल्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीनुसार अधिसुचित केलेल्या योजनेच्या प्रमाणकांनुसार नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत निश्चित केली जाते. शासनाने जाहीर केलेल्या इतर कोणत्याही निकषांचे (पीक पेसेवारी, टंचाईसदृश्य, परिस्थिती, पूर इ.) आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जात नाही.

पाचोरा तालुक्यातील १७७२८ शेतक-यांनी रु.९७ कोटी विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार, संदर्भ हवामान केंद्रावर नोंद झालेल्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीनुसार तसेच अधिसूचित केलेल्या योजनेच्या पिकनिहाय व क्षेत्रनिहाय प्रमाणकांनुसार पाचोरा तालुक्यातील १५२९७ शेतकरी विमा नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरले. रु.४.२३ कोटी नुकसान भरपाई संबंधित शेतक-यांच्या बँकेच्या खात्यावर दि.४ व ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत जमा करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) जळगाव जिल्हयामध्ये हवामान आधारित पीक विमा योजना खरीप २०१४ मध्ये कापूस, ज्वारी, उडीद व मूग या पिकांसाठी भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात आली.

या योजनेअंतर्गत जळगाव जिल्हयातील १,२५,५१६ शेतक-यांनी रु.२९.१८ कोटी विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. सहभागी शेतक-यांपैकी १,१५,४३७ शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले. रु.४१.०० कोटी नुकसान भरपाई रक्कम भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत संबंधित शेतक-यांच्या बँकांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व साखर कारखान्यांत मॅकेनिकल वजनकाटे किंवा ब्रिजेऐवजी इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसविल्याबाबत**

**(२९) १३४३६ (१०-०४-२०१५). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व साखर कारखान्यांत मॅकेनिकल वजनकाटे किंवा ब्रिजेऐवजी इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसविण्याचे आदेश शासनाच्या वैध मापनशास्त्र विभागाने साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी न केल्याने मेकॅनिकल वजनकाटे वापरणा-या साखर कारखान्यांमधील वजनाकाटे, वैध मापनशास्त्र विभागाच्या अधिका-यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास सिल केले करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कोणकोणत्या कारखान्यातील वजनकाटे सील केले आहेत व त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (२५-०५-२०१५) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) गुन्हे दाखल झालेले नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उत्तर सोलापूर मधील बीबीदारफळ येथे "रेशीम पार्क" उभारण्याबाबत**

**(३०) १३४४८ (१०-०४-२०१५). श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर सोलापूर मधील बीबीदारफळ येथे राज्यातील पहिले "रेशीम पार्क" उभारण्यासाठी ग्रामपंचायतीने ५२ एकर जागा दिलेली असून सदर जमिनीवर रेशीम खात्याची नोंद झाली असून स्वतंत्र उतारा देण्यासाठी महसूल खात्याकडून विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :**(१) व (२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून ६२ एकर जागा रेशीम संचालनालयाकडे १९८८ पासून प्राप्त आहे. या जागेचा संयुक्त ७/१२ उतारा ग्राम पंचायत व रेशीम संचालनालय यांच्या नावे आहे. येथे रेशील पार्क उभारण्यासाठी जागेचा स्वतंत्र ७/१२ काढण्यासाठी संचालनालयाने महसूल विभागाकडे अर्ज केला असता सदर जागा माळढोक पक्षी अभयारण्यासाठी अधिसूचित असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणली. त्यामुळे स्वतंत्र ७/१२ मिळवण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी, नान्नज ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर यांची परवानगी घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वन्यजीव अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार या जागेचा स्वतंत्र ७/१२ उतारा करण्यासाठी परवानगी नाकारली आहे. सदर जमिन अधिसूचनेतून वगळण्याची कार्यवाही झाल्यानंतर या जागेचा स्वतंत्र ७/१२ उतारा काढणे शक्य होणार आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**सोलापूर येथील शासकीय केटरिंग महाविद्यालयाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) १३४६९ (०८-०४-२०१५). श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील शासकीय केटरिंग महाविद्यालयाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, या चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार उक्त महाविद्यालयाचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडवणीस (०९-०६-०२०१५) :**(१) होय.
(२) सदर महाविद्यालयातील कर्मचारीवृंद मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच महाविद्यालयाची इमारत ज्या जागेवर बांधण्यात आलेले आहे. त्या जागेबाबत रेल्वेच्या मालकीची बाब उद्भवलेली आहे. त्याबाबत प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, सोलापूर व रेल्वेचे अधिकारी यांची बैठक झाली असून मार्ग काढण्याचा प्रयत्न चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील शिरापूर उपसा प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून रखडले असल्याबाबत.**

**(३२) १३४७७ (०८-०४-२०१५). श्री. सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शिरापूर उपसा प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून रखडले आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित प्रकरणावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

निधीच्या उपलब्धतेनुसार सदर योजनेची कामे प्रथतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतक-याच्या जिव्हाळयाचा असलेल्या बियाण्यांशी संबंधीत महाबीज व राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणा या संस्थांना अकोला जिल्ह्यात शासनाकडून अद्याप पूणवेळ अधिकारी त्याचे काम पाहत असल्याबाबत**

**(३३) १३४८१ (०७-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-याच्या जिव्हाळयाचा असलेल्या बियाण्यांशी संबंधीत महाबीज व राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणा या संस्थांना अकोला जिल्ह्यात शासनाकडून अद्याप पूर्णवेळ अधिकारी त्याचे काम पाहता असल्याचे जानेवारी २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त यंत्रणांवर अद्यापही पूर्णवेळ अधिकारी नसण्याची कारणे काय,

(३) असल्यास, तातडीने या यंत्रणेवर अधिकारी नेमूण शेतक-यांना न्याय देण्याबाबत शासनाची भूमिका काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :**(१) अंशतः खरे असून महाबीजमध्ये दि.१७.०१.२०१५ पासून पूर्ण वेळ अधिकारी त्यांचे काम पाहत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कृषी सहाय्यकांच्या ६९ पदांसाठी लेखी परीक्षा झाली परंतु केवळ कृषी सहाय्यकपदांचीच परीक्षा घेत असल्याबाबत

**(३४) १३४८३ (०७-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कृषी सहाय्यकांच्या ६९ पदांसाठी लेखी परीक्षा झाली परंतु २०१२ मध्ये २६३ विविध पदांची जाहिरात काढल्यानंत केवळ कृषी सहाय्यक पदांचीच परीक्षा घेत असल्यामुळे ही प्रक्रिया वादात सापडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जाहिरातीमधील केवळ कृषी सहाय्यकांच्याच पदांची परीक्षा घेण्याची कारणे काय,

(३) असल्यास, तातडीने २६३ विविध पदांची भरती करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०६-२०१५) :**(१) नाही.

ज्या पदांना लेखी परीक्षा घेण्याबाबत प्रवधान आहे अशा सर्व पदांच्या बाबतीत परिक्षेचे स्वरुप जाहीरातील मध्ये नमूद केले आहे. त्यानुसारच कृषि सहाय्यकांची ६९ पदांची पद भरती लेखी परीक्षेच्या आधारे करण्यात आली आहे.

(२) कृषि विद्यापीठस्तरावर कुलसचिव, कृषि सहाय्यक, चौकीदार प्रायोगशाळा परिचर या एकूण १०५ पदांची भरती पूर्ण झाली असून उर्वरीत वाहन चालक ७ पदांची भरती प्रक्रिया सुरु असून लवकरच ती पूर्ण होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंगणवाडी बालक, स्तनदा आणि किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा टेक होम रेशन (टीएचआर) पुरवठाबाबत

**(३५) १३४८५ (०८-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी बालक, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा टेक होम रेशन (टीएचआर) पुरवठा काही विशिष्ट मोठ्या औद्योगिक सहकारी संस्थांद्वारेच व्हावा याकरिता नागपूर विभागातील शासकीय अधिका-यांकडून प्रयत्न केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू प्रकरणी भ्रष्टाचार करणा-या कंपनी व शासकीय अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यात स्वयंसेवी संस्थांचे गत तीन वर्षापासून ऑडिट न झाल्याबाबत.**

**(३६) १३४९० (०७-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वयंसेवी संस्थांची संख्या मोठी असून गेल्या तीन वर्षापासून विधी आणि न्याय विभागाने लेखा परीक्षकांच्या नियुक्त्या न केल्यामुळे या लाखो संस्थांचे ऑडिट थांबल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विधी व न्याय विभागाने लेखा परीक्षकांच्या नियुक्त्या न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या नियुक्त्या तातडीने करुन संस्थांचे ऑडिट करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला तालुक्यातील (जि.अकोला) शेतक-यांना ज्वारी खरेदी केंद्रावरील विक्रिसाठी आणलेल्या ज्वारीसह परत पाठविण्यात येत असल्याबाबत**

**(३७) १३४९१ (१०-०४-२०१५). श्री. हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला तालुक्यात (जि.अकोला) एकमेव असलेल्या ज्वारी खरेदी केंद्रावर गेल्या काही दिवसांपासून शेतक-यांना विक्रिसाठी आणलेल्या ज्वारीसह परत पाठविण्यात येत आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दुसरीकडे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी ज्वारी खरेदी सुरु असल्याची माहिती दिली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू ज्वारी खरेदी बंद करणा-या अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यात सुरु करण्यात आलेल्या ७ खरेदी केंद्रावरुन शेतक-यांना परत पाठविण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत दि. ३१.३.२०१५ अखेर अकोला जिल्ह्यात सुरु झालेली खरेदी केंद्रे व झालेली भरडधान्य खरेदी पुढीलप्रमाणे आहे.

| खरेदी केंद्र | खरेदी (क्विंटल) | | |
|---|---|---|---|
| | ज्वारी | बाजरी | मका |
| ७ | १८२२९.५० | ०.०० | २१७३.५० |

तसेच अकोला तालुक्यात १५५५९.५० क्विंटल ज्वारी खरेदी झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात कोल वॉशरीज च्या रिजेक्ट कोल वर चालणारे वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासंदर्भात

**(३८) १३५०३ (०४-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात कोल वॉशरीज उभारण्यासाठी मे. डेझिन प्रा.लि, नवी दिल्ली यांची नियुक्ती केली असून विस्तृत प्रकल्प आराखडा अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे लेखी उत्तर मा. ऊर्जा मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना पत्रक्र. कपासू /प्र.क्र.२५६ / ऊर्जा - ४ अन्वये दिनांक ११/०९/२०१४ ला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वॉशरीज चे उभारणी संदर्भातील केंद्रीय वने व पर्यावरण खाते, महाराष्ट्र वीज नियमक आयोग व इतर वैधानिक प्राधिकरण यांच्या कडे संबंधित परवानग्या / मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात कोल वॉशरीज स्थापन करण्यासाठी व कोल वॉशरीज च्या रिजेक्ट कोल वर चालणारे वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर येथे उभारण्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५)** :(१) होय,
(२) प्राप्त झालेल्या विस्तृत प्रकल्प अहवालात कोल वॉशरीज उभारणी संदर्भात बऱ्याचशा त्रुटी असल्यामुळे अहवाल पुनर्विलोकन करण्यासाठी सल्लागार कंपनीकडे पाठविण्यासाठी प्रस्तावित आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील संच क्र. १ व २ चे**
**नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याबाबत**

**(३९) १३५०६ (०४-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील संच क्र. १ व २ चे नुतणीकरण व आधुनिकीकरण करण्याचे नियोजित केल्याचे व सदर संचांसाठी डिसाईन कन्सल्टंट नेमला असून विविध प्रकारचा तांत्रिक अभ्यास पूर्ण झाला असून नुतनीकरणाचा प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे लेखी उत्तर मा. ऊर्जा मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना पत्र क्र. कपासू - २०१४ / प्र.क्र. २५२ / ऊर्जा - ४ अन्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५)** :(१) होय,
(२) कोराडी संच क्र.६ च्या नुतनीकरण व आधुनिकीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर व सदर संचाच्या कामगिरीचा अनुभव घेतल्यानंतर इतर संचांचे नुतनीकरण व आधुनिकरण करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर ताडाळी औद्योगिक क्षेत्रातील मे.गोपानी आर्यन एन्ड पावर कंपनी व्दारे**
**कुठलीही पुर्व सूचना न देता तब्बल ५०० कामगारांना**
**कामावरुन कमी केल्याबाबत**

**(४०) १३५०९ (०७-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडाळी( ता.जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक क्षेत्रातील मे.गोपानी आर्यन एन्ड पावर कंपनी द्वारे कुठलीही पुर्व सूचना न देता तब्बल ५०० कामगारांना कामावरून कमी केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने उक्त कामगारांना पुन्हा कामावर घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०४-०६-२०१५)** :(१) हे खरे नाही.
कंपनीस कच्च्या कामाचा तुटवडा असल्यामुळे दिनांक ३.१२.२०१४ पासून काम उपलब्ध नसल्याचे व्यवस्थापनाने कामगारांना सांगितले होते.
(२) होय.
(३) कामगार कार्यालय, चंद्रपूर येथे दिनांक ४ व ९.१२.२०१४ रोजी व अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे सम्क्ष दिनांक २.१.२०१५ रोजी व्यवस्थापन, कंत्राटदार व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांना चर्चेकरिता पाचारण करण्यात आले होते. कारखान्यात कच्चा माल उपलब्ध नसल्यामुळे जोपर्यंत कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया पूर्ववत सुरु होत नाही. तोपर्यत सर्व कामगारांना १५ दिवसांचे वेतन ले-ऑफ समजून अदा करण्यात यावे. असा सर्वमान्य तोडगा काढण्यात आला व त्यानुसार माहे डिसेंबर, २०१४ या महिन्यात १५ दिवसांचे वेतन ले-ऑफ समजून सर्व कामगारांना अदा करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत व्यवस्थापनाने कोणत्याही कामगाराला कामावरुन कमी केलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात वाहतुक नियंत्रित करणारे पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याबाबत

**(४१) १३५१० (०७-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात दर वर्षी २३ ते २५ हजार नवी वाहने रस्त्यावर येत असून जिल्ह्यातील तीन लाख ७० हजार वाहने नियंत्रीत करण्यासाठी केवळ १४२ वाहतूक पोलीस कार्यरत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात महामार्ग वाहतूक पोलीस म्हणून फक्त १२ कर्मचारी तैनात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाहतुक नियंत्रित करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५)** :(१) व (२)

चंद्रपूर जिल्ह्यात सन डिसेंबर, २०१४ अखेर ३,९७,१८६ नोंदणीकृत वाहने आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील वाहतूक नियंत्रण जिल्हा पोलीस दलातील जिल्हा वाहतूक नियंत्रा शाखा, पोलीस स्टेशनअंतर्गत कर्मचारी आणि महामार्ग पोलीस मदत केंद्र, चंद्रपूर यांच्या मार्फत केले जाते. त्याकरीता जिल्हा वाहतूक शाखेचे दोन अधिकारी व ८४ कर्मचारी असे एकूण ८६, २१ पोलीस स्टेशअंतर्गत ५३ कर्मचारी आणि महामार्ग पोलीस मदत केंद्र, चंद्रपूर यांचे एक अधिकारी व २८ कर्मचारी एकवढे मनुष्यबळ कार्यरत आहे. जिल्हा पोलीस वाहतूक शाखेमध्ये मुख्यालयाशी संलग्न असलेलया १२ कर्मचा-यांचा समावेश आहे.

(३) महामाग्र पोलीस मदत केंद्र, चंद्रपूर येथील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील वातूक नियंत्रणाकरीता आवश्यकता भासल्यास त्यात आणखी वाढ करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नही.

---

**केंद्र शासनाच्या "हमारा जल हमारा जीवन" या अभियानाची**
**अंमलबजावणी चंद्रपूर जिल्ह्यात झाली नसल्याबाबत**

**(४२) १३५२३ (०७-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जलसंसाधन मंत्रालयाने शाश्वत विकासासाठी पाणी व्यवस्थापन या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून "हमारा जल हमारा जीवन" हे अभियान दिनांक १३ ते १७ जानेवारी या कालावधीत पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या एका गावात राबविण्याचे निर्देश दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्देशाची चंद्रपूर जिल्ह्यात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०५-२०१५) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रात लोखंड, पाईपलाईनचे पाईपच गॅस कटरने कापूर चोरी करण्याचे प्रकारात प्रचंड वाढ झाल्याबाबत**

**(४३) १३५२७ (०७-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर औष्णिक वीज केंद्राच्या चारही बाजुला सुरक्षाव्यवस्था असतांनासुध्दा मोठ्या प्रमाणात लोखंड, पाईपलाईनचे पाईपच गॅस कटरने कापून चोरी करण्याचे प्रकारात प्रचंड वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०६-२०१५) :** (१) दि.३०.१२.२०१४ रोजी चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील राखेची विल्हेवाट लावण्यात येत असलेल्या ६० मिटरची पाईपलाईन ॲशबंड परिसरातून चोरी झाली असल्याचे खरे आहे.

(२) व (३) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा एजन्सीतर्फे पोलीस स्टेशन भद्रावती येथे गुन्हा दाखल केला असून पोलीसांनी एकूण ९ आरोपींना मुद्देमालासह अटक केली आहे. सदर प्रकरणी न्यायालयात दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयात कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबत असल्याबाबत**

**(४४) १३५३० (०८-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबत कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना प्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना शासन स्तरावरुन देण्यात आल्या असल्याचे मा.कृषि मंत्री यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ चे कपासू-२४१४/प्र.क्र.३३/७-अ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी प्रस्ताव तयार करुन शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने 'शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) राज्यात नवीन कृषि महाविद्यालय स्थापनेच्या अनुषंगाने कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे स्तरावर सुरू आहे.
(३) व (४) सदरचा आराखडा शासनस्तरावर अंतिम झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीबाबत**

**(४५) १३५३१ (०८-०४-२०१५). श्री. नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २८ जानेवारी, २०१५ ला जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूरच्या परिसरातील सभागृहात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.पालकमंत्री जिल्हा चंद्रपूर यांना स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी निवेदनाव्दारे मौजा चिंचाळा येथे रस्ते बांधकामासाठी रु.३० लक्ष आणि चंद्रपूर तालुकयातील तब्बल ३३ गांवातील शेतकरी खरीप पिकांचे नुकसान भरपाईच्या आर्थिक मदती पासून वंचित असल्याबाबत चे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व दिनांक २८ जानेवारी, २०१५ ला सादर केलेले उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांची दिनांक २८/०१/२०१५ ची निवेदने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे उचित कार्यवाही करण्यासाठी पाठविली आहेत.

---

**वान प्रकल्प (जि.अकोला) क्षेत्रातील शासकीय कुपनलिकांच्या डिपी (जनित्र) चोरी गेल्याने सिचंन लाभाथीधारकाची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४६) १३५४१ (०८-०४-२०१५). श्री. प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वान प्रकल्प अंतर्गत प्रकल्पाचा क्षेत्रात ११९ कुपनलिका शासनातर्फे बसविण्यात आल्या होत्या त्यापैकी ६२ कुपनलिकांची डिपी (जनित्र) अज्ञात व्यक्तीकडून चोरी गेल्याने सदर कुपनललिका लाभधारक शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी पासून वंचित राहावे लागत आहे, तसेच अज्ञात चोरट्या विरूध्द संबंधित विभागाने एफआयआर दाखल करून ही अद्याप चोरट्यचा सुगावा लागला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिस विभागाकडे पाठपुरावा केला आहे काय वा करण्यात येत आहे, तसेच कारवाईचा तपशील काय आहे,
(३) याप्रकरणी ६२ कुपनलीकांचे (डीपी) जनित्र चोरी गेल्याने यापुढे शासनाचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान होणार नाही त्यानुसार उपायायोजना केली अथवा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, पर्यंत कोणतीही व्यवस्था केली नसल्यास शासनाच्या कोट्यावधीच्या नुकसानीला जबाबदार कोण आहे व याबाबत सदर विभागामार्फत व्यवस्था करण्यात आली आहे काय,
(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५)** :(१) होय, विषयांकित जनित्रे (डी.पी) जलसंपदा विभागाकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आलेले होते.
(२) पोलीस विभागाकडे सहायक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लि. तेल्हारा व संग्रामपूर यांच्या मार्फत वेळोवेळी तक्रार नोंदविण्यात आली आहे.
(३, ४ व ५) जनित्र (डी.पी) पुनश्च बसविण्यात जलसंपदा विभागामार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस सूचीत करण्यात आले आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार व रॉकेल परवाना धारक संघटनेच्या मागण्यांबाबत**

**(४७) १३५५८ (०७-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार व रॉकेल परवाना धारक संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्याकरीता गत १५ वर्षापासून निवेदने देवूनही शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे येत्या दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी तालुकास्तर तर दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ रोजी जिल्हास्तर, दिनांक २ मार्च, २०१५ रोजी विधानसभा आणि दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी संसदेवर मोर्चा आणून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने संघटनेच्या न्याय मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-०५-२०१५)** :(१) होय. अमरावती जिल्हा प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ केरोसिन परवानाधारक संघ यांनी स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्या, अडचणी, समस्या, कमिशनमध्ये वाढ, वाहतुक रिबेटचा प्रश्न इत्यादी मागण्यांकरिता दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ पासून बेमुदत संप करण्याची घोषणा केली होती.

(२) सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी संघटनेच्या पदाधिका-यांसोबत दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेतलेल्या बैठकीत कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत व वाहतुकीचे प्रश्नाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने "राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी घोषित केलेला बेमुदत संप राज्य शासनाचे अंतिम आदेश होईपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे."

दिनांक ५ मार्च, २०१४ च्या शासन निर्णय अन्वये रु.५०/- वरुन आता रु.७०/- अशी वाढ दुकानदारांच्या कमिशनमध्ये करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बडनेर भुजंग (ता.अचलपूर, जि.अमरावती) या गावातील फेर भुजल मुल्यांकन प्रक्रियेबाबत

**(४८) १३५५९ (०७-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेर भुजंग (ता.अचलपूर, जि.अमरावती) या गावास अतिशोषित व शोषित वर्गवारीतून बाहेर काढण्याबाबत फेर भुजल मुल्यांकन प्रक्रिया पुर्ण झाली असून यंत्रणांच्या सदोष कार्यपध्दती दाखवून देणा-या श्री. देवीदास संपतराव भुरकट, सारडा नगर, अजंनगाव सुर्जी, जि.अमरावती यांना वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वे आणि विकास यंत्रणा अमरावती यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) संचालनालय, भुसवियं पुणे यांनी पत्र क्र. ३१५६ दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ अन्वये अमरावती जिल्ह्यातील अतिशोषित पाणलोट क्षेत्राचे लघु पाणलोट क्षेत्र निहाय फेर भुजल मुल्यांकन करण्यासाठी सूचना देण्याची कारणे काय आहेत,

(४)असल्यास, सदर गावांमधील भुजल मुल्यांकनामध्ये तफावत आढळली आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(५)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०५-२०१५)** :(१) व (२) वरिष्ठ भूवैज्ञानिक, अमरावती यांनी त्यांचे दिनांक २८/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये श्री.देविदास संपतराव भुरकट, सारडानगर, अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती यांना भूजल मुल्यांकनाची पध्दत व ती सदोष नसल्याचे कळविण्यात आले आहे.

भूजल मुल्यांकनाची प्रक्रिया सदोष नसून केंद्रशासनाच्या अधिपत्त्याखालील केंद्रीय भूमीजल मंडळ यांनी स्विकृत केलेल्या भूजल अंदाज समिती १९९७ (Ground water Estimation committee-१९९७) च्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली आहे. त्यामुळे केलेली कार्यवाही नियमानुसार आहे.

(३) केंद्र शासनाने स्विकृत केलेल्या भूजल अंदाज समिती १९९७ च्या मार्गदर्शक तत्वानुसार

अतिशोषीत व शोषीत पाणलोट घोषीत करणेपूर्वी त्यांचे लघू पाणलोटात विभाजन करुन त्यांचे पुनर्मुल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यानुसार अतिशोषीत व शोषीत पाणलोटाचे लघु पाणलोट क्षेत्र निहाय फेर भूजल मुल्यांकन करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे संचालनालयामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) केंद्र शासनाने स्विकृत केलेल्या भूजल अंदाज समिती, १९९७ च्या मार्गदर्शक तत्वानुसार अतिशोषीत व शोषीत पाणलोटांचे लघु पाणलोटात विभाजन करुन त्यांचे पुनर्मुल्यांकनाचे काम अंतिम टप्प्यात चालू आहे. पाणलोट क्षेत्र निहाय भूजलांचे मुल्यांकन करण्यात येते. भूजल मुल्यांकनद्वारे पाणलोटची निश्चित झालेली वर्गवारी ही पाणलोट क्षेत्रात समाविष्ट सर्व गावांसाठी लागू होत असते. त्यानुसार स्वतंत्र गाव निहाय भूजल मुल्यांकनाची प्रक्रिया करण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील कांदिवली (प) येथे असणा-या शिधावाटप कार्यालयामध्ये कर्मचारी संख्या अपुरी असल्याबाबत**

**(४९) १३५८५ (०७-०४-२०१५). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)मुंबईतील कांदिवली (प) येथे असणा-या शिधावाटप कार्यालयामध्ये कर्मचारी संख्या अपुरी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयात ५१ कर्मचारी व ४० निरिक्षक इतकी आवश्यकता असताना केवळ १७ कर्मचारी व ७ निरिक्षक उपलब्ध असून सदर अपु-या कर्मचा-यांमुळे नागरिकांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शिधावाटप कार्यालयासाठी स्वतःची जागा नाही व ज्या जागेत कार्यालय आहे ती जागा रिकामी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने नोटीसही दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१५) :** (१) होय.
(२) कांदिवली येथील कार्यालयात निरीक्षकांनी १७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७ भरलेली आहेत. लिपिक - टंकलेखकांची १६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८ पदे भरलेली आहेत. उपलब्ध कर्मचा-यांकडून कामे करुन घेण्यात येत आहेत. नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येते.
(३) कार्यालयाची जागा रिकामी करण्याकरिता लघुवाद न्यायालयाने आदेश दिले आहेत, मात्र उच्च न्यायालयाने दिनांक २१ व २२ जुलै, २०१० च्या सुनावणीत या आदेशास स्थगिती दिली आहे.

(४) लिपिक-टंकलेखकांची रिक्त पदे भरण्याकरिता मागणीपत्र सादर केलेले आहे. निरीक्षकांची पदे पदोन्नती देऊन भरण्याची पूर्वतयारी सुरु आहे.

लघुवाद न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिलातील सुनावणीत उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील रेशीम पार्क उभारण्याबाबत**

**(५०) १३६०६ (१०-०४-२०१५). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील जगप्रसिध्द पैठणी उद्योगास लागणा-या कच्चा मालाचे उत्पादन स्थानिक स्तरावर होण्यासाठी या ठिकाणी राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमामधून रेशीम पार्क करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशीम संचालनालय नागपूर यांनी उक्त रेशीम पार्कसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) संचालनालयाने त्यांच्या अहवालात येवला येथे सद्य:स्थितीत असलेली तुती लागवड, पैठणी विणकामाच्या संदर्भात असलेल्या सोयी सुविधा याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. संचालकांचा अहवाल, नजिकच्या कालावधीत इतर स्त्रोतातून तेथे निर्माण होत असलेल्या सुविधा याची पडताळणी करुन तसेच स्थानिक गरजा विचारात घेवून येवला येथील रेशीम उद्योग विकासासाठी इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.